**प्रेसनोट** **दि.१७/०५/२०१९**

## लष्कर पोलीस स्टेशन,पुणे शहर

## हरविलेला मोबाईल परत मिळवुन दिले बाबत

लष्कर पोलीस स्टेशन अंकीत पुलगेट पोलीस स्टेशनच्या हद्दीत असणारे अलमदुल्लाह हॉटेलमध्ये शमशुद्दीन सुफीयाननदीम वय १८ वर्षे रा.,हडपसर,पुणे यांचा फोन हरविला आहे तो मिळुन येत नसल्याने शमशुद्दीन सुफीयाननदीम हे पुलगेट पोलीस चौकी येथे तक्रार देणे करीता गेले असता,चौकी अधिकारी सहा.पोलीस निरीक्षक वर्षा शिंदे व पो.ना.महेश फल्ले यांनी त्यांची तक्रार ऐकुन घेवुन मोबाईल शोधणे करीता तपास पथकातील सी.सी.टि.व्ही.चे काम पाहणारे कर्मचारी पो.शि.अमोल राऊत व पो.शि.राहुल शिंगे यांना बोलावुन मसपोनि शिंदे,पो.ना.फल्ले,पोशि.राऊत व पो.शि.शिंगे असे सदर ठिकाणी मोबाईलचा शोध घेणे करीता गेले व तेथे असलेल्या सीसीटिव्ही कॅमेरा चेक केला असता,एक इसम त्याच्या मित्राचा फोन समजुन नजर चुकीने घेवुन गेला होता.त्याच्या गाडीचा नंबर सीसीटिव्ही मध्ये दिसुन आल्याने त्यांच्या गाडी नंबर वरून त्या इसमाचा शोध लावला व त्यास मोबाईल पुलगेट पोलीस चौकी घेवुन येण्यास सांगितले व शमशुद्दीन सुफीयाननदीम यांचा मोबाईल सदर इसमाने आणुन दिला तो मोबाईल त्यांचाच असल्याची खात्रीकरून मसपोनिशिंदे,पो.ना.फल्ले,पोशि.राऊत व पो.शि.शिंगे यांनी शमशुद्दीन सुफीयाननदीम यांचे ताब्यात दिला.

सदरची कामगीरी ही वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री चंद्रकांत भोसले साोव यांचे मार्गदर्शनाखाली सहा.पोलीसनिरीक्षक वर्षा शिंदे,पो.ना.महेश फल्ले,पो.शि.अमोल राऊत व पो.शि.राहुल शिंगे यांनी केलेली आहे.

